**<u>प्रेस नोट</u>** **दि.१८/०६/२०१९**

**कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे**

## <u>वेश्या व्यवसायातून परदेशातील मुलीची सुटका</u>

दि.१४/०६/२०१९ रोजी कोरेगाव पार्क पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.मदन बहाद्दरपुरे यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, सुरज पटेल नावाचा एजंट हा वेगवेगळया हॉटेल मध्ये मुली ठेवून स्वतः तसेच त्याचे एजंट साथीदारांच्या साहाय्याने मुलींचे फोटो पाठवून वेश्या गमनसाठी रक्कम ठरवून ग्राहकांना मुली वेश्या गमनासाठी पुरवितो व तो वेश्या गमनाकरिता आलेल्या ग्राहकाकडून ५ हजार रू. नमूद मुली मार्फत अथवा त्याचे साथीदाराकडून वेश्या गमनाचे पैसे स्वीकारतो. त्यातून स्वतःसाठी ठराविक हिस्सा काढून घेवून त्यावर स्वतःची उपजीविका भागवितो. तो कोरेगाव पार्क भागात ग्राहकांच्या मागणीनुसार वेगवेगळया ठिकाणी मुली पुरवितो व तो वेश्या व्यवसाय चालवितो, अशी बातमी मिळाल्याने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. मदन बहाद्दरपुरे, कोरेगाव पार्क पो.स्टे. पुणे यांनी पोलीस स्टेशन कडील अधिकारी व स्टाफ व पंचासह **सेंट लॉर्न हॉटेल, कोरेगाव पार्क, पुणे** येथे जावून छापा घातला असता छाप्यामध्ये उझबेकिस्तान देशाची पीडित मुलगी मिळून आली. सदर मुलीकडून सुरज पटेल मोबाईल नंबर ९१४५६४५७६३ नावाचा एजंट हा वेश्या व्यवसाय चालवत असल्याचे समजले असून, सदर मुलीस पैशाचे आमिष दाखवून पुण्यामध्ये आणून तिचेकरवी वेश्या व्यवसाय करून घेत आहेत, असे तपासात निष्पन्न झाल्याने, वर नमूद एजंटविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे व नमूद पीडित परदेशी मुलीची वेश्या व्यवसायातून सुटका करण्यात आलेली आहे व तिस रेस्क्यु फाऊंडेशन, हडपसर, पुणे येथे संरक्षणकामी ठेवण्यात आलेली आहे.

सदरची कारवाई ही मा. श्री.बच्चन सिंग सो., पोलीस उप आयुक्त, परि.२, पुणे शहर, यांचे मार्गदर्शनाखाली श्री.मदन बहाद्दरपुरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोरेगाव पार्क पो.स्टे. पुणे, श्रीमती कल्याणी शिंदे, पोलीस उप निरीक्षक, कोरेगाव पार्क पो.स्टे. पुणे व त्यांचे पथकाने कारवाई केलेली आहे.

(मदन बहाद्दरपुरे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे